दिनांक २२/०१/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशाने " **BEST CONVICTION OF THE MONTH** " **माहे नोव्हेंबर—२०१९** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर — २०१९

| | | |
|---|---|---|
| **०१** | **टिळकनगर पो ठाणे परिमंडळ—६** | **गु.र.क्र. ३४५/१३, कलम— ३०२, १२० (ब), १०७, २०१, ३४ भादंवि सह ३७ (१) (अ) १३५ मुपोका** |

**—: फौजदारीपात्र कट रचून खून:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत:—** सदर गुन्हयातील आरोपी नंदा झोडगे उर्फ सुनंदा शिवाजी नरवणे हिचे घरी शिवाजी किसन नरवणे यांचे वरचेवर येणे—जाणे होते. हे आरोपीत नंदा झोडगे उर्फ सुनंदा शिवाजी नरवणे हिचा पहिल्या नवऱ्याचा मुलगा मयत रोहन राजेंद्र झोडगे याला आवडत नव्हते. तसेच घर नावावर करण्यावरून आरोपी नंदा झोडगे व मयत रोहन झोडगे यांच्यात नेहमी भांडणे होत होती.

दिनांक २१/१०/२०१३ रोजी मयत रोहन झोडगे याने घर नावावर का करीत नाही म्हणून आरोपी नंदा झोडगे हिला शिवीगाळ करून हाताने मारहाण करून सोडणार नाही अशी धमकी दिली होती. याबाबत आरोपी नंदा शिवाजी नरवणे हिने टिळकनगर पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रारीवरून अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला होता. तसेच मयत रोहन झोडगे हा आरोपी नंदा झोडगे नरवणे हिच्या अंगचटीला जावून विकृत चाळे करण्याचा प्रयत्न करीत असे. त्यामुळे आरोपी शिवाजी नरवणे व आरोपी नंदा झोडगे नरवणे यांनी कट रचून मयत रोहन झोडगे याचा कायमचा काटा काढण्याच्या उद्देशाने दिनांक २५/१०/२०१३ रोजी ००.३० ते ०४.०० वाजताचे दरम्यान आरोपी नंदा झोडगे हिने उत्तेजन दिले व आरोपी शिवाजी किसन नरवणे याने रोहन झोडगे याच्या डोक्यात दगडी पाटा टाकून व धारदार चाकूने त्याचा गळा चिरून त्यास जिवे ठार मारले. तसेच आरोपी नंदा झोडगे हिने तिच्या वापरातील मोबाईल फोन नाहीसा करून पुरावा नष्ट केला म्हणून गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. औदुंबर लक्ष्मण पवार हिं/५१वर्षे, धंदा—नोकरी |
| **बळीत/मयत** | :— | रोहन राजेंद्र झोडगे हिं/२५ |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) नंदा राजेंद्र झोडगे हिं/४५ वर्षे,<br>२) शिवाजी किसन नरवणे, हिं/५६ वर्षे<br>आ.क्र. १— दिनांक २५/१०/१३<br>आ.क्र. २— दिनांक २६/१०/१३ |
| **निकाल दिनांक** | :— | १९/११/२०१९ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :— | आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांना मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्र. २४, मुंबई यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्यः—** दि. २५/१०/२०१३ रोजी आरोपी नंदा झोडगे उर्फ सुनंदा शिवाजी नरवणे ही पोलीस ठाणेत आली व मयत रोहन राजेंद्र झोडगे याचा त्याचे रहाते घरात कोणीतरी खुन केला आहे. तेव्हा माझी फिर्याद नोंद करा असे सांगु लागली. परंतु नमुद व्यक्तीचा संशय आल्याने तांत्रीक बाबीचे विश्लेषण केले असता घटनेच्या वेळी आरोपी नंदा झोडगे हिचा प्रियकर आरोपी शिवाजी किसन नरवणे (पोलीस उप अधिक्षक संरक्षण व सुरक्षा) हे असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदर घटनेचा तपास करताना टिळकनगर पोलीस ठाणेचे तपासी पथक कोणत्याही दबावाला बळी न पडता मोंबाईल, सी.डी.आर. व सी.सी. टिव्ही फुटेजवरून तसेच प्राप्त हस्तगत हत्यारावरून शिताफीने दोन्ही आरोपीला अटक केले. अटक आरोपीताचे विरोधात सबळ पुरावे प्राप्त करून तपासी अधिकारी पो.नि. विलास जाधव व पथकाने अटक आरोपीचे विरोधात दोषारोपपत्र विहीत वेळेत सादर करून अटक आरोपीतास कठोर शिक्षा होण्यास परिश्रम घेतले.

**टिळकनगर पोलीस ठाणे पथकातील तपासी अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोनि | विलास महादेव जाधव | प्रशस्तीपत्र |
| २ | पोउनि | रविंद्र भाऊ उत्तेकर | प्रशस्तीपत्र |
| ३ | पोउनि | आशिषकुमार आसराजी आडसुळ | प्रशस्तीपत्र |
| ४ | पोउनि | सचिन लक्षमण पाटील | प्रशस्तीपत्र |
| ५ | पोउनि | वैजनाथ सिद्रामप्पा उपासे | प्रशस्तीपत्र |
| ६ | पो.ह.क्र. २५३९६ | मुरलीधर संभाजी सांवत. | प्रशस्तीपत्र |
| ७ | पो.ह.क्र. २५१९८ | शिवाजी आनंतराव देसाई, | प्रशस्तीपत्र |
| ८ | पो.ना.क्र.९६०१९६ | विनोद विश्वास म्हात्रे. | प्रशस्तीपत्र |
| ९ | पो.ना.क्र.९६०१५९ | संजय सुखलाल अव्हाड, | प्रशस्तीपत्र |
| १० | पो.शि.क्र.०६१६९३ | राजेंद्र वामन इंगवले | प्रशस्तीपत्र |
| ११ | पो.शि.क्र. ०३७६८ | मनोज दिलीप जाधव | प्रशस्तीपत्र |

| ०२ | बांगुरनगर पो. ठाणे परिमंडळ—१२ | गु.र.क्र.२५६/१३ कलम—३०२, ३९७ भादंवि |
|---|---|---|

## —:जबरी चोरी करून खून:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत**:— यातील फिर्यादी यांचा भाऊ चेतन परसराम भारव्दाज, वय ४६ वर्षे हा त्यांच्या आईवडिलांसह दि. ०८/०९/२०१३ रोजी गणपती उत्सवासाठी त्यांच्या मुळ घरी भागीरथी बिंल्डीग, मिरा—भाईंदर रोड, जिल्हा— ठाणे येथे राहण्यास आला होता. दि. १५/१०/२०१३ रोजी सायंकाळी १८.०० वा. दरम्यान फिर्यादी यांचा भाऊ काही व्यावसायिक कामाकरीता त्यांच्या स्वत:चे घरी म्हणजे रूस्तमजी एलान्झा सी—विंग, फ्लॅट नं. २६०१, मालाड (पश्चिम), मुंबई येथे जातो असे सांगुन सोबत त्यांची सॅक बॅग, लॅपटॉप, दोन मोबाईल, मनी पर्स, इत्यादी असे घेवुन दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत परत येतो असे घरच्यांना सांगुन निघुन गेला होता.

दुसऱ्या दिवशी दि. १६/१०/२०१३ रोजी दुपारी फिर्यादी यांना स्वाभीमान ऑटो युनियन सांताक्रुज, मुंबई येथुन त्यांना चेतन भारव्दाज यांची मनी पर्स मिळाली असून त्यामध्ये लायसन्स व इतर कागदपत्र आहेत ते घेवुन जावेत असा फोन आला. म्हणुन फिर्यादी व त्याचे मित्र—नातेवाईक यांनी चेतन भारव्दाज यांस त्याच्या मोबाईलवर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु संपर्क होवु शकला नाही. म्हणुन सरतेशेवटी फिर्यादी व त्यांचे वयोवृध्द वडिल हे दि. १६/१०/२०१३ रोजी रात्रौ २०.३० वा. सुमारास चेतन भारव्दाज याच्या रूस्तमजी एलान्झा सी विंग, फॅल्ट नं. २६०१घरी आले. त्यांनी त्यांच्याकडील चावीने सेफ्टी डोअर उघडला परंतू मुख्य दरवाजा अर्धवट उघडाच होता. तो ढकलुन आत आले असता हॉलच्या फरशीवर रक्ताने माखलेल्या पायाचे ठसे दिसुन आले. म्हणुन ते हॉल शेजारील बेड रूममध्ये गेले असता बेडरूमच्या दारात व बेडवर भरपुर रक्त सांडले असल्याचे त्यांना दिसुन आले, तर बेडरूमच्या पश्चिम भिंतीलगतच्या ड्रेंसीग टेबलजवळ चेतन भारव्दाज हा रक्ताच्या थारोळयात गळयावर, पोटावर, बरगडीजवळ, कमरेजवळ मोठया कापीव जखमी झालेल्या स्थितीत दिसुन आला म्हणून फिर्यादी यांनी लागलीच पोलीस नियंत्रण कक्षास संपर्क साधून माहिती दिली.

नियंत्रण कक्षाकडून बांगूरनगर पोलीस ठाण्यास माहिति मिळताच रात्रपाळी कर्तव्यावर असलेले तत्कालीन पोलीस निरीक्षक सी. ए. गायकवाड हे डयुटी ऑफिसर सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वनाथ चव्हाण व स्टॉफसह घटनास्थळी आले. त्यानंतर लागलीच घटनास्थळी स्थानिक डॉक्टरांना बोलावुन घेवून जखमी अवस्थेतील चेतन भारव्दाज यांची डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांनी त्यास मयत म्हणुन घोषित केले. सदर घटनेबाबत बांगुरनगर पोलीस ठाण्यास प्रथमत: गु.र.क्र.२५६/२०१३, कलम ३०२ भा.दं.वि.सं. अन्वये दाखल करून तपास करण्यात आला होता. गुन्हयाच्या तपासात यातील अज्ञात आरोपीताने मयत इसमाचे सॅक बॅग, लॅपटॉप, दोन मोबाईल, मनी पर्स, इत्यादी जबरीने चोरू न नेले असल्याचे समजुन आले होते. त्यावरुन गुन्हयाच्या कलमात वाढ करुन भा.दं.वि.सं. कलम— ३९७ हे लावण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री राजेश परसराम जांगीड वय ४९ वर्षे, |
| **बळीत/मयत** | :— | चेतन परसराम भारव्दाज वय ४६ वर्षे |
| **आरोपी अटक** | :— | झिशान उर्फ नवाझ अहमद मोहम्मद नाखी सिद्दीकी वय २० |

| | | |
|---|---|---|
| **व दिनांक** | | वर्षे २५/१०/२०१३ |
| **निकाल दिनांक** | :— | दिं. २८/११/२०१९ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :— | १) भा.दं.वि.सं. कलम ३०२, ३९७ अन्वये दोषी ठरवुन त्यांस कलम ३०२ भा.द.वि.सं करीता आजन्म कारावास व रू. १,००,०००/—(रू. एक लाख) दंड<br>२) कलम ३९७ भा.दं.वि.सं करीता १० वर्षे सश्रम कारावास व रूपये २५०००/—( रू. पंचवीस हजार ) दंड |

**<u>तपास कौशल्य</u>:—**सदरची घटना ही दि. १५/१०/२०१३ व दि. १६/१०/२०१३ रोजीच्या दरम्यानच्या रात्री बंद फ्लॅट मध्ये घडली होती. त्यामुळे सदर गुन्हयाच्या घटनेस कोणी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नव्हते. त्याच प्रमाणे सदरची घटनाही रूस्तमजी एलान्जा या बांगुरनगर पोलीस ठाणे हद्दीतील उच्चभ्रु वस्तीमध्ये घडली असल्याने संवेदनशील होती. अशा परिस्थितीत तांत्रिक तपास, गोपनिय चौकशी व गोपनिय माहितीच्या सहाय्याने तपास करण्यात आला. यातील आरोपी झिशान तथा नवाज अहमद मोहम्मद नाखी सिद्दीकी वय २० वर्षे याचे नाव निष्पन्न झाल्याने त्यास दि. २५/१०/२०१३ रोजी अटक करण्यात आली होती.

बांगुर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक सी.ए.गायकवाड यांनी मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली एकहाती कौशल्यपुर्ण तपास करून गुन्हयात वापरलेले शस्त्र धारदार, कटर त्याचप्रमाणे जबरीने चोरीला गेलेल्या मालमत्ते पैकी लॅपटॉप, मोबाईल फोन, ॲसेसरीज, क्रेडीट—डेबिट कार्ड, इत्यादी मालमत्ता हस्तगत केली होती. तसेच एकही प्रत्यक्षदर्शि साक्षीदार उपलब्ध नसतांना साक्षी पुरावे, शास्त्रीय पुरावे, तंत्र—वैज्ञानिक पुरावे व वैद्यकीय पुरावे सादर केले. व निर्धारित कालावधीत गुन्हयाचे दोषारोपपत्र मा. दिंडोशी सत्र न्यायालय, कोर्ट रूम क्रं. १०, मुंबई यांचे न्यायालयात दाखल केले. तपासी अधिकारी यांनी मा.न्यायालयात स्वत: नियमित उपस्थित राहुन पंच, साक्षीदार यांना सुनावणीकरीता नियमित न्यायालयात उपस्थित ठेवून तपासा दरम्यान मेहनतीने व कौशल्याने गोळा केलेले पुरावे न्यायालयात सादर केले.

**बांगुरनगर पोलीस ठाणे पथकातील तपासी अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सपोआ | चंद्रशेखर गायकवाड | प्रशस्तीपत्र |
| २ | पोउनि | रमेश भाऊसाहेब आंबेडकर | प्रशस्तीपत्र |
| ३ | पो.ह.क्र. ९१७८ | केशव वासुदेव दळवी | प्रशस्तीपत्र |